# ग्राहक गा-हाणे निवारण मंच
## महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## औरंगाबाद परिमंडळ,औरंगाबाद.

तक्रार क्र.सीजीआरएफ/एझेड/जालना/२८४/२०१०/११

तक्रार दाखल दिनांक :- २०/०४/२०१०
निकाल दिनांक :- १९/०६/२०१०

श्री सुंदरलाल श्रीराम यादव,
पंचमुखी हनुमान मंदिरा जवळ, जालना
ह.मु.घर नंबर ४८६,
छावणी, दर्जी बाजार, औरंगाबाद.
(ग्राहक क्र.५१००३००८६४४७) अर्जदार/ग्राहक

विरुध्द

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादीत
शहर विभाग जालना.

गैरअर्जदार

| | | |
|---|---|---|
| कोरम | विष्णु अं. हंबिरे | अध्यक्ष |
| | प्रदीप. अ. सगणे | सदस्य/सचिव |
| | विलासचंद्र सु. काबरा | सदस्य |

अर्जदाराने ग्राहक गा-हाणे निवारण मंचासमोर 'अनुसुची - अ' मध्ये, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गा-हाणे निवारण मंच व लोकपाल ) विनियम २००६ च्या नियम ६.१० अंतर्गत

तक्रार दाखल केली आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या तक्रारीची एक प्रत दिनांक २०/०४/२०१० रोजी जालना मंडळाचे कार्यकारी अभियंता ( प्रशासन ) व नोडल अधिकारी, जालना यांना पाठविण्यात आली. अर्जदाराच्या गा-हाण्याबाबतची सुनावणी दिनांक ०४/०५/२०१० रोजी ठेवण्यात आली.

ग्राहकाने दाखल केलेल्या तक्रारीचा सारांश खालीलप्रमाणे आहे.

१) तक्रारकर्ते व अर्जदार श्री सुंदरलाल श्रीराम यादव हे मुळ ग्राहक श्री रंगनाथ लक्ष्मण यादव यांचे जवळचे नातेवाईक असुन ग्राहक क्रमांक ५१००३००८६४४७ हे घरगुती कनेक्शन पुर्वी रंगनाथ लक्ष्मण यादव यांच्या नांवाने व घर क्रमांक १-१७-२८ मोदीखाना जालना येथे देण्यात आलेले होते.मुळ ग्राहक श्री रंगनाथ लक्ष्मण यादव यांचा मृत्यु दिनांक २९/१०/२००७ रोजी झाल्यानंतर त्यांची पत्नी श्रीमती सुशीला लक्ष्मण यादव यांना मुलबाळ नसल्यामुळे यांनी तक्रार कर्ते श्री सुंदरलाल श्रीराम यादव यांना त्यांचे रजिष्टर मृत्युपत्र दिनांक १९/०३/२००८ द्वारे दत्तकपुत्र म्हणुन वारस नेमले आहे. वरील मुत्युपत्राद्वारे आपण जागेचे वारस असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले आहे.जालना येथील घरामध्ये अर्जदार व त्याची बहीन श्रीमती शंकुतला यादव हे राहत आहेत.वरील घरगुती कनेक्शनचे महावितरणतर्फे देण्यात आलेली वीज देयके अर्जदाराने स्वतः भरलेली आहेत.

२) वरील जागेचे अर्जदार कायदेशीर वारस असतांना व विद्युत कनेक्शनचा वापर ते स्वतः करीत असतांना वरील कनेक्शन त्यांच्या संमती व सुचनेशिवाय उपकार्यकारी अभियंता जालना यांनी त्यांचे कार्यालयीन आदेश क्रमांक १७३६ दिनांक १८/११/२००९ नुसार श्री अविनाश बालराज नगरे यांच्या नांवाने करुन देण्यात आले व कोणतीही पुर्व सुचना न देता त्यांचा विद्युत पुरवठा दिनांक १४/१२/२००९ रोजी बंद करण्यात आला. अर्जदाराने बंद झालेल्या विद्युत पुरवठ्याबाबत महावितरण कंपनीकडे चौकशी केली असता नविन वीज ग्राहक श्री अविनाश बालराज नगरे यांच्या लेखी अर्जानुसार

वरील घराचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आल्याचे अर्जदारास सांगण्यात आले. अर्जदाराने वरील जागेचे आपण कायदेशीर मालक असुन वीज कनेक्शनचा वापर आपण स्वतः करीत आहोत व नियमीतपणे वीज बिल भरत असल्यामुळे वीज पुरवठा खंडीत करु नये व खंडीत केलेला वीज पुरवठा पुन्हा सुरु करण्यात यावा अशी विनंती महावितरणच्या संबंधित कार्यालयास केली परंतु महावितरण कंपनीने त्यांचा वीज पुरवठा सुरु केला नाही. अर्जदाराने पुढे असे नमुद केले आहे की, श्री रंगनाथ लक्ष्मण यादव यांचे वरील घर व इतर मालमत्तेच्या मालकी हक्काबाबत त्यांचा वाद श्री अविनाश बालराज नगरे यांच्या सोबत मा.दिवाणी न्यायालय जालना यांच्या कोर्टात सुरु असुन प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.वरील घरामध्ये त्यांची विधवा बहीण राहत असुन तीला कॅन्सरचा आजार आहे.विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे तीच्या जिवीतास धोका उत्पन्न झाला आहे करीता त्यांनी मंचात तक्रार दाखल करुन वीज पुरवठा सुरु करण्याचे आदेश महावितरण कंपनीस देण्याची विनंती मंचास केली.

३) वरील प्रकरणाची सुनावाणी दिनांक ०४/०५/२०१० व ११/०५/२०१० रोजी घेण्यात आली.सुनावणीच्या दरम्यान नोडल अधिकारी जालना श्री कमरुद्दीन व अर्जदार श्री सुंदरलाल श्रीराम यादव उपस्थित होते. नोडल अधिकारी यांनी लेखी जबाब सादर केला त्यांच्या जबाबानुसार वरील घरगुती कनेक्शन नोव्हेबर २००९ पर्यंत श्री रंगनाथ लक्ष्मण यादव यांच्या नांवाने सुरु होते.दिनांक ०७/११/२००९ रोजी अविनाश बालराज नगरे रा.जालना यांनी वरील घर क्रमांक १-१७-२८ पंचमुखी हनुमान मंदिर जवळ ही मालमत्ता आपल्या मालकीची असल्याबाबत कागदोपत्री पुरावा व ग्राहकाचे नांव बदली करण्याकरीता महावितरणचे नियमाप्रमाणे इतर अवश्यक दस्ताऐवज सादर केले व त्यानुसार वरील घरगुती कनेक्शन श्री अविनाश बालराज नगरे यांच्या नांवाने उपकार्यकारी अभियंता जालना यांच्या आदेश क्रमांक १७३६ दिनांक १८/११/२००९ नुसार करुन देण्यात आले.नविन ग्राहक श्री अविनाश बालराज नगरे यांनी दिनांक १४/१२/२००९ रोजी लेखी

अर्ज सादर करुन वरील घरामध्ये मला वीजेची गरज नसल्यामुळे वीज पुरवठा बंद करण्यात यावा अशी विनंती महावितरण कंपनीस केल्यावरुन त्यांचा वीज पुरवठा दिनांक १४/१२/२००९ रोजी पोलवरुन तात्पुरता बंद करण्यात आला.नियमानुसार महावितरण कंपनीने वरील प्रकरणात केलेली कारवाई योग्य असल्याचे नोडल अधिकारी यांनी सांगीतले. अर्जदाराने मुळ ग्राहक रंगनाथ लक्ष्मण यादव यांचे वरील घराबाबत व इतर मालमत्तेच्या वारस हक्काबाबत मा.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठस्तर जालना यांच्या न्यायालयात दाखल केले प्रकरण क्रमांक ४८/२०१० व प्रकरण क्रमांक २२७/२००८ ची प्रत मंचात सादर केली. दोन्ही बाजुचे प्रतिपादन ऐकुण घेतल्यानंतर प्रकरण निकालासाठी ठेवण्यात आले.

४) दोन्ही बाजुकडुन मंचात दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिंसुन येते की,मुळ वीज ग्राहक श्री रंगनाथ लक्ष्मण यादव यांचे जालना येथील मालमत्तेबाबत त्यांचे व त्यांच्या पत्नीच्या मृत्युनंतर अर्जदार श्री सुंदरलाल श्रीराम यादव व अविनाश बालराज नगरे तसेच सुभाष मधुकर यादव यांच्यात मालकी वारस हक्काबाबत वाद असुन त्याबाबत प्रकरण मा.दिवाणी न्यायालय जालना येथे प्रलंबित आहे.मुळ वीज ग्राहक रंगनाथ लक्ष्मण यादव यांच्या मालकीचे घर क्रमांक १-१७-२८ पंचमुखी हनुमान मंदिरा जवळ मोदीखाना जालना येथे असुन तेथे ग्राहक क्रमांक ५१००३००८६४४७ चे घरगुती कनेक्शन होते.वरील घरामध्ये अर्जदार श्री सुंदरलाल श्रीराम यादव यांची बहीण शंकुतला राजेद्र यादव राहत असल्याबाबत नगरसेविका सौ.अनिता विष्णु वाघमारे वार्ड क्रमांक ०८ मोदीखाना जालना यांचा दाखला व ओळखपत्र अर्जदारने सादर केले असुन वरील घराचा ताबा श्री सुंदरलाल श्रीराम यादव यांच्याकडे आहे.वरील घरगुती कनेक्शनचा ते स्वतः वापर करीत असुन नियमीतपणे वीज देयक भरणा करीत आहेत. श्री अविनाश बालराज नगरे यांनी अर्जदाराच्या अपरोक्ष वरील कनेक्शन स्वतः चे नांवे करण्याबाबत प्रस्ताव महावितरण कंपनीकडे सादर केला.त्यांनी प्रस्तावासोबत मालकी हक्काबाबत आवश्यक कागदपत्रे सुध्दा जोडलेली आहेत. त्याकागदपत्राच्या सत्यत्तेबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. महावितरण कंपनीने दिनांक १८/११/२००९ रोजी आदेश पारीत करुन

वरील घरगुती कनेक्शनचे नांमातंर श्री अविनाश बालराज नगरे यांच्या नांवे करुन  दिल्यानंतर श्री नगरे यांनी दिनांक १४/१२/२००९ रोजी कनेक्शनचा वीज पुरवठा बंद करण्याबाबत अर्ज दाखल केला. महावितरण कंपनीने त्वरीत कारवाई करुन त्याच दिवशी म्हणजे दिनांक १४/१२/२००९ रोजी वीज पुरवठा खंडीत केला.यावरुन असे दिसुन येते की, ज्या मालकीहक्काचे कागदपत्राबाबत न्यायालयात प्रकरण न्याप्रविष्ठ आहे तीच कागदपत्रे श्री अविनाश बा.नगरे यांनी महाविरतण कंपनीकडे सादर करुन वरील कनेक्शन स्वतःचे नांवे करुन घेतले व घराचा ताबा अर्जदार श्री सुदरलाल श्रीराम यादव यांनी त्वरीत सोडुन द्यावा या उद्देशाने कनेक्शन बंद करण्याबाबत अर्ज दाखल करुन वीज पुरवठा  महावितरण कंपनीकडुन बंद करुन घेतला.वरील प्रकरणात महाविरतण कंपनीचे जालना येथील संबंधित अधिका-यांनी वादग्रस्त  प्रकरणाची खातरजमा न करुन घेता कनेक्शनचे नामांतर कंरुन वीज पुरवठा खंडीत केला असल्याचे दिसुन येत आहे.

५) उपलब्ध कागदपत्रावरुन वरील जागेवर अर्जदार श्री सुंदरलाल श्रीराम यादव यांचा ताबा असुन त्याठिकाणी त्यांची कॅन्सरग्रस्त अजारी बहीण राहत असल्याचे स्पष्ट झाले आहे. अर्जदार नियमीतपणे वीज बिल भरत असतांना व वरील जागेच्या मालकी हक्काबाबतचा वाद न्यायप्रविष्ठ असतांना तेथील वीज पुरवठा खंडीत करणे नैसर्गीक न्यायानुसार योग्य होणार नाही. वीज ही जिवनावश्यक बाब असल्यामुळे न्यायालयाचा निर्णय होईपर्यंत व अर्जदार नियमीतपणे वीज बिल भरत असेल तर त्यांचा विद्युत पुरवठा खंडीत करु नये असे मंचाचे मत आहे.

## आदेश

१) महावितरण कंपनीने वीज ग्राहक क्रमांक ५१००३००८६४४७ चा खंडीत केलेला वीज पुरवठा ताबडतोब सुरु करावा.

वरील आदेशाचे पालन करुन त्याचा अहवाल तीस दिवसांच्या आंत मंचास सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **प्र. अ. सगणे** | **विलासचंद्र सु. काबरा** | **विष्णु अं. हंबिरे** |
| **सदस्य/सचिव** | **सदस्य** | **अध्यक्ष** |